


गुन्हे विशेष

# सोनेतस्करीचे जगड्व्याळ

आफ्रिका खंडात दरवर्षी बेकायदामार्गाने सोन्याचे उत्खनन होत असून त्याची कोठेही नोंद न करता अन्य देशांत पाठविले जात आहे. स्विसएड नावाच्या संस्थेने अहवालात म्हटले, आफ्रिकेतून बेकायदापणे बाहेर जाणाऱ्या सोन्याचे प्रमुख ठिकाण संयुक्त अरब अमिराती आहे. २०२२ मध्ये आफ्रिकेतून ४३५ टन म्हणजे ३० अब्ज डॉलर म्हणजेच २५ खर्व रुपयांपेक्षा अधिक सोन्यांची तस्करी करण्यात आली आणि ते सोने अन्य देशांत पाठविण्यात आले. हे सोने बहुतांश लहान खाणीतून काढले गेले आहे.

**४५० टन सोने**

स्विसएडच्या मते, आफ्रिकेच्या तस्करींचे प्रमुख ठिकाण संयुक्त अरब अमीरात होते आणि २०२२ मध्ये ४०५ टन सोने यूएईत दाखल झाले. संस्थेच्या मते, गेल्या एक दशकांत यूएईमध्ये अडीच हजार टन चोरीचे सोने दाखल झाले आणि त्याची किमत ११५ अब्ज डॉलरपेक्षा अधिक होती. यासंदर्भात यूएईच्या अधिकाऱ्यांनी सोन्याची तस्करी रोखण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. सोने आणि अन्य मौल्यवान धातूच्या व्यापारावरून नवीन नियम देखील लागू केले आहेत. अहवालानुसार, आफ्रिकेत लहान खाणीतील सोन्याच्या उत्खननाचा उद्योग वेगाने वाढत आहे आणि यात लाखो नागरिक जीव धोक्यात घालत केवळ पैशापोटी काम करत आहेत. त्याची व्याप्ती औद्योगिक पातळीवर होणाऱ्या उत्खननाच्या तुलनेत अधिक आहे. २०१९ मध्ये रॉयटर्सच्या एका अहवालात म्हटले, आफ्रिकेतून शेकडो टन सोन्याची दरवर्षी तस्करी होत असून ते युएईमार्गे युरोप आणि अमेरिकेच्या बाजारात विकले जात आहे. चोरीने येणाऱ्या सोन्याचा फटका देशाच्या महसुल उत्पन्नाला बसत असल्याने तज्ज्ञ आणि सरकारकडून चिंता व्यक्त केली जात आहे. याप्रमाणे एक बेकायदा पर्यायी अर्थव्यवस्था उभी राहत असून त्याचा वापर आर्थिक गैरव्यवहार, दहशतवादी संघटनांना पैसे देणे आणि निर्बंधांचे उल्लंघन या कामी होऊ शकतो.

**आकड्यातील फरक**

स्विसएडचे तज्ज्ञ मार्क उमेल म्हणतात, आर्थिक गैरव्यवहारात यूएईचा मोठा वाटा आहे. कारण तस्करीचे सोने त्यांच्याच मार्गे अन्य देशात पाठविले जाते. दरवर्षी ४०० टन पेक्षा अधिक सोने बेकायदा मार्गाने युएईत दाखल होत असेल तर तेथे कायदा आणि नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्याचे सिद्ध होते. पण यूएई ही बाब मान्य करत नाही. अहवालात तज्ज्ञांनी आफ्रिका खंडातून निर्यात होणाऱ्या सोन्याचे प्रमाण अन्य देशांत आयात होणाऱ्या सोन्याशी केली. त्यात बराच फरक जाणवला. पण घोषित निर्यात आणि आयातीतील फरक हा स्वित्झर्लंड आणि भारताच्या आकड्यात आढळून आला नाही. हे दोन्ही देश आफ्रिकेतून सोन्याची मोठ्या प्रमाणात आयात करतात. अहवालानुसार, आफ्रिकेतून दरवर्षी २० टनपेक्षा अधिक सोन्याची तस्करी १२ देशांत केली जाते. यासंदर्भात युएई सरकारला विचारणा केली असता अन्य देशांच्या आयात निर्यातीसाठी यूएई जबाबदार नसल्याचे स्पष्ट केले. ते केवळ आपल्याच देशातील आयात निर्यातीसाठी बांधील आहेत, असे सांगत यूएई पोलिसांची बांधिलकी ही अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि व्यवस्थेच्या आधारे देखरेख आणि आकडेवारी निश्चित करण्याची आहे, असे सांगितले.

**लहान पातळीवर उत्खनन**

२००९ नंतर सोन्याची किंमत दुप्पटीपेक्षा अधिक झाली आहे. तेव्हापासून मोठ्या संख्येने नागरिक लहान खाणीतील सोन्याचे उत्खनन करण्याच्या कामाला लागले. स्विसएडच्या अंदाजानुसार, आफ्रिकेत लहान पातळीवर काम करणाऱ्या या खाणीतून २०२२ मध्ये ४४३ ते ५९६ टन सोने काढले. यात ७० टक्क्यांपेक्षा अधिक सोन्याची नोंद कोठेही नाही. अधिकृत रुपाने औद्योगिक खाणीतून आफ्रिकेत दरवर्षी ५०० टन सोने काढले जाते. एकुणातच यूएईमध्ये दाखल होणारे तस्करीचे बहुतांश सोने हे लहानसहान खाणीतूनच काढलेले आहे. उमेल म्हणतात, काही स्विस कंपन्यांच्या व्यवहारात धूर्त अधिकारी आहेत. ते आफ्रिकेच्या लहान खाणींकडून थेटपणे सोने खरेदी करू इच्छित नाहीत, परंतु युएईत तस्करीने आलेले सोने खरेदी करण्याबाबत आग्रही असतात.



**उपजिविकेचा स्रोत**

खाण कामगारांसाठी सोने उत्खनन हे उपजिविकेचे महत्त्वाचे साधन असण्याबरोबरच काही वेळा हे कठीण काम गंभीर स्थिती आणि महत्त्वाच्या पर्यावरण परिणामाला देखील कारणीभूत ठरते. सोन्याच्या खाणीतुन उत्खनन करताना केलेले जाणारे प्रयोग कामगार अणि परिसरातील समुदायासाठी हानीकारक असून आरोग्यावर गंभीर परिणाम करणारे आहेत. जंगलतोड ही पर्यावरणाचे नुकसान वाढवत आहे. बेकायदा सोन्याचा ओघ हा भ्रष्टाचार आणि संघर्षाला अर्थसाह्य करण्यास पोषक ठरत आहे. 'ओईसीडी' चर्चेच्या काळात हंटर यांनी सोन्याच्या क्षेत्राला ऐतिहासिक रुपातून विनाशकारी म्हटले होते आणि त्यामुळे कामगारांच्या उपजिविकेच्या पर्यायाबाबत विचार करण्याची गरज आहे, अशी त्यांनी भूमिका मांडल्यानंतर सोने हे नक्कीच आफ्रिकेतील अनेक देशांतील संघर्षाला कारणीभूत आहे हे स्पष्ट झाले. प्रामुख्याने मध्य आफ्रिकी गणराज्य, कांगो लोकशाही गणराज्य, सुदान आदींचा उल्लेख करता येईल. सहेल येथील कट्टरपंथीय समुह सोन्याच्या क्षेत्रातून लाभ कसा रितीने मिळवतात, हे जगाला चांगलेच ठाऊक आहे. सोन्याच्या क्षेत्राला व्यावसायिक आणि औद्योगिक रुप देण्यासाठी आणि त्याची हमी मिळवण्यासाठी बरेच काम करण्याची गरज आहे. यानुसार आफ्रिकी सरकारांना सोन्यातून महसूल मिळेल.

### विशेष जबाबदारी

तज्ज्ञांच्या मते, सोन्याच्या उत्खननाला वरदान म्हणून सिद्ध करण्यासाठी आफ्रिकी सरकार, आंतरराष्ट्रीय संस्था आणि खासगी संस्था यांच्यात समन्वयाने सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. कडक नियम लागू करणे, डेटा संकलन टप्प्यांत सुधारणा करणे, शाश्वत उत्खनन प्रथांना प्रोत्साहन देणे या सर्वांना तर्कसंगत ठेवणे आणि पारदर्शकता आणणे या गोष्टी सोने उद्योगासाठी महत्त्वाच्या आहेत. स्विस एजन्सी फॉर डेव्हलपमेंट अँड कॉऑपरेशनने स्विसएड अहवालासाठी अर्थसाह्य करण्यासाठी मदत केली. जागतिक पातळीवरच्या सोन्याच्या व्यापारात एक प्रमुख खेळाडू या नात्याने स्वीत्झर्लंडवर सोन्याची आयात नैतिक स्रोतातून कशी होईल याची विशेष जबाबदारी सोपविली. अर्थात राज्याने आतापर्यंत पारदर्शकता आणण्यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. अर्थात त्यानी पुढाकार घेतला पाहिजे. यानुसार खाण कामगार, कुटुंबांना आणि आफ्रिकी देशात राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनात सुधारणा आणू शकू.

# वाजवून घ्या!

खरेदी-विक्रीच्या व्यवहारात फसवणूक होणं, ही फारशी आश्चर्यकारक घटना नाही. साध्या शेंगदाण्यापासून रिअल इस्टेटपर्यंत अनेक व्यवहारांमध्ये फसवणूक झाल्याच्या घटना आपण वारंवार ऐकत असतो. पण काही घटना 'युनिक' असतात. फसवणुकीच्या एखाद्या घटनेत हस्तक्षेप करण्याची वेळ एखाद्या पॉवरफुल देशाच्या दूतावासावर यावी, म्हणजे मामला 'युनिक'च मानला पाहिजे. आपली फसवणूक झालीये, हे खरेदीदाराच्या लक्षात येऊन तक्रार दाखल व्हायला तब्बल दोन वर्षं लागली, हे दुसरं वैशिष्ट्य! तिसरी अद्भुत गोष्ट म्हणजे वस्तूची मूळ किंमत आणि खरेदीदाराकडून वसूल केलेली किंमत यातलं प्रचंड अंतर. दागदागिन्यांची हौस कुणाला नसते! आपल्याच देशात दागिन्यांची हौस जास्त आहे, असं नाही. अमेरिकेतल्या एका महिलेला या हौसेचीच भलीमोठी किंमत मोजावी लागली. जयपूर हे तसं दागदागिन्यांसाठी प्रसिद्ध शहर. तिथला जोहरी बाजार म्हणजे देशी-विदेशी पर्यटकांचं आकर्षणस्थळ. तिथल्याच एका दुकानातून या अमेरिकन महिलेनं तब्बल सहा कोटींचे दागिने विकत घेतले. दागिने अस्सल सोन्याचे असल्याचं प्रमाणपत्रही तिला दिलं गेलं. दागिने घेऊन ती अमेरिकेत निघून गेली. काही दिवसांनी तिनं ते दागिने तिथल्या प्रदर्शनात मांडले. दागिन्यांवरचा सोन्याचा मुलामा तोपर्यंत जरा फिका पडलेला असावा. कारण अनेकांनी ते दागिने बनावट असल्याची शंका व्यक्त केली. दागिन्यांची तपासणी केली, तेव्हा लक्षात आलं, त्यांची किंमत अवघी तीनशे रुपये आहे. चांदीच्या दागिन्यांवर सोन्याचा मुलामा देऊन ते बनवलेत!

ही महिला सध्या फसवणुकीविरुद्ध दाद मागायला भारतात आलीये. सर्वांत आधी ती अर्थातच 'त्या' दुकानात गेली. आपण बनावट दागिने दिले होते, हा आरोप तर दुकानदारानं सपशेल धुडकावून लावलाच; शिवाय आपल्या दुकानातून दागिने पळवल्याचा उलटा आरोप या महिलेवरच केला. तिने दुकानातून खरेदी केलेले दागिने आणि आता परत आणलेले दागिने एकच आहेत, हे आता सिद्ध व्हावं लागेल. तथापि, तिच्यावर चोरीचा आरोप करणारा दुकानदार आणि त्याचा चिरंजीव फरार झाल्यामुळं व्यवहारात खरोखर हेराफेरी झाल्याचा संशय बळावलाय. खरेदीच्या तारखेचं सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झालंय. दागिने अस्सल असल्याचं प्रमाणपत्र देणाऱ्याला पोलिसांनी अटक केलीये. दुकानदार बापलेकांविरुद्ध लुकआउट नोटीस जारी केलीये. दरम्यान, न्याय मागण्यासाठी ही महिला थेट अमेरिकी दूतावासात पोहोचली. तिथल्या अधिकाऱ्यांनी पोलिसांना या प्रकरणाचा छडा लावण्याची विनंती केली. मामला सहा कोटींचा आहे आणि त्याचा उलगडा व्हायला किती दिवस लागतील, याचा नेम नाही. तोपर्यंत संबंधित महिलेने करायचं काय, हा प्रश्नच आहे. डोळ्यासमोर केलेल्या खरेदीची ही तऱ्हा; मग वस्तू समोर नसताना केलेल्या खरेदीत काय-काय होत असेल?

ऑनलाइन स्मार्टफोन मागवणाऱ्याची एक कहाणी ताजी आहे. त्या माणसानं पार्सल फोडल्यानंतरचा फोटो त्याच्या कहाणीसह व्हायरल केलाय. मोबाइलचं बॉक्स उघडल्यावर त्याला कपडे धुण्याच्या साबणाच्या तीन वड्या मिळाल्या. संबंधित ऑनलाइन शॉपिंग कंपनीची 'हेल्पलाइन' काहीच करत नाही, असा त्याचा आरोप आहे. मागेही एकाला स्मार्टफोनऐवजी भांडी धुण्याचा साबण मिळाला होता. हे प्रकार कंपनीत घडतात, की डिलिव्हरीदरम्यान, यावर तपासयंत्रणांचं संशोधन चाललंय. पण कोणतीही वस्तू 'वाजवून' घेण्याच्या आपल्या परंपरेची थोरवी अशा घटनांमधून पटते, एवढं खरं!